


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १९१ • पुणे • मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या



### पिस्तूल बाळगणारा अल्पवयीन ताब्यात

पुणे (आरंभ पर्व) : देशी बनावटीचे बेकायदा पिस्तूल बाळगणाऱ्या एका अल्पवयीनाला खंडणी विरोधी पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडून पिस्तूल, तसेच एक काडतूस जप्त करण्यात आले. सिंहगड रस्त्यावरील दांडेकर पूल परिसरात ही कारवाई करण्यात आली. दांडेकर पूल परिसरात खंडणी विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी गस्त घालत होते. त्या वेळी एक अल्पवयीन दांडेकर पूल परिसरात थांबला असून, त्याच्याकडे पिस्तूल असल्याची माहिती तपास पथकातील पोलीस कर्मचारी आझाद पाटील यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेण्यात आली. तेव्हा त्याच्याकडे पिस्तूल सापडले. अल्पवयीनाने पिस्तूल का बाळगले ?, तो गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत होता का ?, याद्दष्टीने तपास करण्यात येत आहे. पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे, सहायक आयुक्त राजेंद्र मुळीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राम राजमाने, उपनिरीक्षक गौरव देव, सुरेंद्र जगदाळे, अमोल राऊत, आझाद पाटील, शेखर खराडे, चेतन आपटे, किरण पड्याळ यांनी ही कारवाई केली.

# सुनेत्रा पवारांविरोधात स्थानिक उमेदवारीचा अभाव

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरोधात बारामतीतील कोणीच धजावेना; उमेदवारी अर्ज भरलेले तिघेही पुणे जिल्ह्याबाहेरील

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदार संघाची पोटनिवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात बारामतीतील कोणीच निवडणूक लढविण्यासाठी धजावत नसल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, आतापर्यंत बारामतीबाहेरील तीन जणांनी अर्ज भरले आहेत. काँग्रेसने उमेदवार उभे करण्याची तयारी दर्शविली असून, काँग्रेसच्या भूमिकेवर बारामतीतील निवडणूक बिनविरोध होणार की नाही, हे स्पष्ट होणार आहे. या



पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास ३० मार्चपासून सुरुवात करण्यात आली. पहिल्याच दिवशी तीन उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. त्यामध्ये जतमधील सतीश कदम यांनी हिंदुस्तान जनता पार्टी या पक्षाकडून अर्ज भरला आहे. साताऱ्यातील शरद भिसे यांनी अपक्ष आणि सांगोल्यातील राघू घुटूकडे यांनी न्यू राष्ट्रीय समाज पार्टीच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे हे काम पाहत आहेत. पहिल्याच दिवशी उमेदवारी अर्ज भरलेले तिघेही बारामतीबाहेरील आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सहा एप्रिलपर्यंत आहे. त्यानंतर आणखी उमेदवारी अर्ज येण्याची शक्यता आहे. मात्र, संबंधित उमेदवार हे अर्ज कायम ठेवणार की माघार घेणार, यावर पोटनिवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया घेतली जाणार की नाही, हे स्पष्ट होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार २३ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया होणार असून, चार मे रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे.

या पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतल्यास काँग्रेसने निवडणूक लढविण्याची तयारी दर्शविली आहे. काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार यांनीही महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने उमेदवारीसाठी दावा केला नाही, तर काँग्रेस ही जागा लढवण्यास तयार असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, काँग्रेसकडेही इच्छुक उमेदवाराची वानवा असल्याचे दिसून येते. भाजप उमेदवार उभा करण्याची शक्यता कमी आहे. दरम्यान, गेल्या विधानसभा निवडणुकीत अजित पवार यांच्याविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून युवा नेते युगेंद्र पवार यांना उमेदवारी देण्यात आली होती. त्या निवडणुकित युगेंद्र पवार यांचा एक लाख ८९९ मतांनी पराभव झाला. आता अजित पवार यांच्या निधनामुळे पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना विधानसभा किंवा विधानपरिषदेचे सदस्य व्हावे लागणार असल्याने पोटनिवडणुकीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

## सुरक्षारक्षकाकडून पाईपने मारहाण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

येरवड्यातील पं. जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र संचलित बालकांच्या निरीक्षण गृहात एका अल्पवयीनाला पाईपने मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. या प्रकरणी निरीक्षण गृहातील सुरक्षा रक्षकाविरुद्ध येरवडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शिमोन सुरेश साबळे (वय ४२) यांनी याबाबत येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी मारहाण करणाऱ्या सुरक्षारक्षकाला नोटीस बजाविण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, येरवड्यातील पं. जवाहरलाल नेहरु उद्योग केंद्र आहे. या केंद्रात गंभीर, तसेच किरकोळ गुन्हे करणाऱ्या अल्पवयीनांना बाल न्याय मंडळाच्या आदेशाने ठेवण्यात




येते. अल्पवयीनांचे समुपदेशन या केंद्रात केले जाते. निरीक्षण गृहातील एका अल्पववयीनाची भांडणे झाली होती. त्याने एका अल्पवयीनाला मारहाण केली होती. त्यानंतर निरीक्षण गृहातील सुरक्षारक्षकाने अल्पवयीनाला प्लास्टिक पाईपने मारहाण केली. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर साबळे यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलीस उपनिरीक्षक सत्रे तपास करत आहेत.

## सोसाट्याचा वारा, ढगांचा गडगडाट, पुण्यात 'जोरधार'!

### बाणेर आणि परिसरात गारांचा पाऊस


**पुणे (दै. आरंभ पर्व)**


भरून आलेले आभाळ, सोसाट्याच्या वाऱ्यासह पुणे आणि परिसरात सोमवारी दुपारनंतर जोरदार पाऊस झाला. बाणेरसह काही ठिकाणी गारांचा पाऊस पडला. रविवारपासून उकाडा प्रचंड वाढलेला असताना पावसाच्या सरींनी तापमानात काही प्रमाणात घट होऊन दिलासा मिळाला.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार जेट स्ट्रीम म्हणजे हवेच्या वरच्या स्तरात पाच ते दहा किमी अतंरावरून पश्चिमेकडून दक्षिणेकडे थंड हवेचा झोत ताशी ७० ते ८० किमी वेगाने वाहत आहे. हा थंड हवेचा झोत सरळ न वाहता वर-खाली नागमोडी पद्धतीने वाहत आहे. विदर्भापासून दक्षिण कर्नाटकपर्यंत कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार आहे. त्यामुळे अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरावरून बाष्पयुक्त वारे राज्याच्या दिशेने येणार आहेत. परिणामी, वाऱ्याचा वेग ताशी ३० ते ५० किलोमीटर राहील. बाष्पयुक्त वारे थंड हवेत मिसळतील, ही स्थिती पाऊस आणि गारपीट होण्यास पोषक असते, असे स्पष्ट करत भारतीय हवामानशास्त्र विभागाने राज्याच्या बहुतांश ठिकाणी पाऊस आणि तुरळक ठिकाणी गारपीट होण्याचा अंदाज वर्तवला आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी सकाळपासूनच उकाडा वाढला होता.



सकाळी दहा वाजल्यापासूनच उन्हाची तीव्रता जाणवू लागली होती. दुपारी दोन वाजल्यानंतर वातावरणात बदल होण्यास सुरुवात झाली. आकाश ढगांनी व्यापले, अंधारून आले. ढगांच्या गडगडाटासह शहराच्या मध्यवर्ती भागात दुपारी तीनच्या सुमारास पावसाच्या सरी कोसळल्या. सोसाट्याच्या वाऱ्याने मोठ्या प्रमाणात धुळ उडाली. त्यापूर्वी बाणेरसह काही ठिकाणी गारा पडरण्यासह जोरदार पाऊस झाला.



# घरात पोहोचू लागलेले इराण युद्धाचे परिणाम!

इराणवर अमेरिकन, इस्रायली हल्ले सुरू होऊन आता महिना होत आला. पहिल्या ७२ तासात इराणी शिया राजवट सत्तेवरून खाली येईल आणि आपली गुलाम राजवट इराणवर येऊन आपण हा विषय मार्गी लावून मग क्युबाचा घास घ्यायला मोकळे होऊ ही ट्रम्पची योजना काही पूर्ण होताना दिसत नाही.

इराणी सैन्याने पहिल्या काही दिवसात होर्मुझ स्ट्रेट बंद केल्याने जागतिक तेल पुरवठा विस्कळीत झाला आहे. आता इराण सध्या काही देशांची जहाजे आणि तेल टँकर्स प्रत्येकी २ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स म्हणजे सुमारे १८ कोटी रुपये घेऊन काही देशांची जहाजे होर्मुझ स्ट्रेट मधून जाऊ देत आहे त्यात भारतीय जहाजे सुद्धा आहेत. होर्मुझच्या आत आणि बाहेर सुमारे साडे तीन हजार जहाजे, टँकर्स अडकून पडले आहेत. आजपर्यंत इराणी सैन्याला न जुमानता बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या २० जहाजांवर इराणी सैन्याने मिसाईल किंवा ड्रोन डागून ती जाळल्याने कुणीही या धाडसात उतरायला तयार नाही.

जागतिक तेल पुरवठ्याच्या विस्कळीत होण्याने फक्त पेट्रोल डिझेलची टंचाई निर्माण होईल अशी सगळ्यांची धारणा असते. परंतु आधुनिक जगात क्रूड तेलापासून निर्माण होणाऱ्या पदार्थांनी आणि वस्तूंनी इतक्या प्रमाणात घुसखोरी केलेली आहे की क्रूड पुरवठा बंद म्हणजे सामान्य माणसाचं आयुष्य ठप्प अशी स्थिती आहे. काल भारतीय संसदेत पंतप्रधान मोदी यांनी याची लॉकडाऊन सोबत केलेली तुलना ही ह्या टोकाच्या क्रूड अवलंबनामुळेच आहे.

याचे दूरगामी परिणाम लक्षात ठेवले आणि आपल्याला नेमक्या काय अडचणी येऊ शकतात हे बघितलं तर येणारे काही महिने आपण काळजी घेऊ शकतो.

१. गॅस तुटवडा : कतरच्या रास लफ्फान गॅस टर्मिनल वर झालेल्या इराणी हल्ल्यात मोठ्या नुकसानामुळे भारताच्या ४७% गॅस पुरवठ्यावर थेट परिणाम झाला आहे. यामुळे गॅसवर आधारित सगळे उद्योग अडचणीत आहेत. कोळशाला पर्याय म्हणून, प्रदूषण विरहित आणि वापरायला सोपा म्हणून एलपीजी गॅस कित्येक उद्योगात एकमेव इंधन स्रोत म्हणून वापरला जातो. याच्या पुरवठ्यात व्यत्यय आल्याने होणारी अडचण आता समोर येऊ लागली आहे.

रेस्टॉरंट आणि तयार अन्न उद्योगाला याचा सर्वाधिक फटका बसला आहे. याचा थेट परिणाम येणाऱ्या काळात फूड होम डिलिव्हरी उद्योगावर होईल. यात लक्षावधी लोक डिलिव्हरी चेनमध्ये राहून रोजगार कमावतात ते याने बेरोजगार होतील.

जगातील क्रमांक २ चे सिरॅमिक उत्पादन हब गुजरातच्या मोर्बी मध्ये विकसित झालेलं आहे. इथे देशातील ९०% टाईल्स उत्पादन होतं आणि यात ९ लाखाच्या आसपास माणसे काम करतात.इथे वार्षिक ५०,००० कोटींची उलाढाल होते पैकी १८,००० कोटींची निर्यात होते. युद्ध सुरू झाल्यापासून इथल्या ५०० कारखान्यांनी काम बंद केलं आहे कारण सध्या फक्त घरगुती गॅस पुरवठा ही सरकारची प्राथमिकता आहे. याचा परिणाम काही काळानंतर रिअल इस्टेट मधील रोजगारावर होईल कारण घर, फ्लॅट बांधून झाला तरी अंतर्गत कामे टाईल्स नसल्याने खोळंबतील.

काचेच्या बाटल्या आणि गृहोपयोगी वस्तूंच्या भट्ट्या मोठ्या प्रमाणात गॅस वापरतात. या भट्ट्या बंद करून परत चालू करण्यात मोठा वेळ जातो आणि परत सुरू करताना नुकसान होऊ शकतं. बाटल्यांचा पुरवठा खंडित किंवा विस्कळीत झाला की दारू, औषधे पॅकिंग साठी वापरल्या जाणाऱ्या बाटल्या महाग होणार किंवा अपुऱ्या पुरवठ्यामुळे अडचणी निर्माण होणार. याला पर्याय म्हणून प्लास्टिक बाटल्यांचा पर्याय बघावा तर तो ही पेट्रोलियम पदार्थांपासून बनतो त्यामुळे त्यातही अडचण आहेच.

२. पेट्रोकेमिकलवर आधारित औषध उद्योग : कित्येक आधुनिक औषधे पेट्रोकमिकल पासून बनतात. त्यामुळे त्याच्या अपुऱ्या पुरवठ्याचा परिणाम औषध उत्पादनावर होणं स्वाभाविक आहे. अनेक औषधात जवळपास सगळे इंग्रेडिएंट पेट्रोकेमिकल मधून येतात.

आपण रोजच्या आयुष्यात सगळ्यात जास्त वापरतो ते औषध म्हणजे पॅरासिटामॉल ते फिनॉलपासून तयार होतं. आयबुप्रोफेन हे वेदनाशामक आयसोब्युटिल्बेन्झिन आणि प्रोपियोनिक ॲसिडपासून तयार होतं. डायबेटिक पेशंट रक्तातील साखर कमी करण्यासाठी वापरतात ते मेटफॉर्मिन ८० ते ९०% पेट्रोकेमिकल आधारित असतं. याशिवाय अन्य औषधांसाठी लागणारा ९९ टक्के कच्चा माल पेट्रोकेमिकलपासून येतो. प्लास्टिक बनवणारे 'क्रॅकर्स' बंद झाले की औषधांचा कच्चा मालही उपलब्ध व्हायचा बंद होतो.

होर्मुझ स्ट्रेट मधून औषध निर्मितीसाठी लागणारा 'नॅफ्था' जगभरात पोचतो, ती सध्या बंद आहे. नॅफ्था हा औषध उद्योगात सॉल्व्हेंट म्हणून वापरतात आणि ॲक्टिव्ह इंग्रेडियंट वेगळा करण्यासाठी त्याचा उपयोग होतो. भारत हा जगातील जेनेरिक औषधांचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. जगाच्या २० टक्के



आणि अमेरिकेच्या ४० टक्के गरजा भारत पूर्ण करतो. पण सध्या पुरवठ्यातील व्यत्ययामुळे हा उद्योग संकटात आहे. कमी पुरवठ्यामुळे सरकारने घरगुती गॅस पुरवठ्याला प्राधान्य दिल्याने उद्योगांना मिळणाऱ्या पेट्रोकेमिकल उत्पादनांची टंचाई निर्माण झाली आहे. भारतातील 'सीरम इन्स्टिट्यूट' सारख्या संस्था जगाला ४०-५०% लसी पुरवते, त्याही याच पेट्रोकेमिकल पदार्थांवर अवलंबून आहेत. लसीच्या बाटल्या, सिरिंज, पॅकेजिंग मधील अत्यंत उच्च दर्जाचं विशेष ग्रेडचं प्लास्टिक आणि लसीमधील घटकही पेट्रोकेमिकलवर आधारित आहेत. त्यामुळे याच्या उत्पादन खर्चात वाढ आणि उपलब्धतेत घट होऊ घातली आहे.

३. खते आणि कृषी उत्पादन : जागतिक रासायनिक खतांच्या उत्पादनात अरब देश आणि इराणचा वाटा २०% आहे पण युरिया उत्पादनात हा वाटा ४६% आहे. भारत, ब्राझील, चीन हे अरब देशांचे मोठे ग्राहक आहेत. भारत आपल्या वार्षिक गरजेच्या ५०% युरिया अरब देशातून घेतो. शिवाय अमोनियम नायट्रेट सारखी अन्य खते अरब देशातून येतात. आज रशियाने खतांच्या निर्यातीवर बंदी घालण्याची घोषणा केल्याने भारतासाठी आगामी काळात वाढलेल्या दराने खते विकत घ्यावी लागतील. शिवाय कमी खतांमुळे देशातील अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. खतांच्या वाढलेल्या दरांमुळे आणि अपुऱ्या पुरवठ्यामुळे जगभरात अन्नाच्या टंचाईची शक्यता आत्ताच बोलून दाखवली जात आहे. अन्न टंचाई आणि राजकीय स्थिरता याचा जवळचा संबंध आहे. ज्या ज्या देशात अन्न टंचाई निर्माण होते आणि महागाई वाढते त्या त्या देशात सत्ताधारी पक्षांना आंदोलने आणि हिंसाचाराचा सामना करावा लागतो असा इतिहास आहे यामुळे आशिया, आफ्रिका आणि लॅटीन अमेरिकेत याने बरीच राजकीय वादळे येऊ घातली आहेत.

४. सल्फर टंचाई : अरब देशांचा सल्फर उत्पादनात ५०% जागतिक वाटा आहे. जवळपास सर्व रिफायनरी इराणी हल्ल्यांनी प्रभावित झालेल्या आहेत किंवा होर्मुझ स्ट्रेट बंद असल्याने तयार उत्पादन जागतिक बाजारात जायला रस्ता उपलब्ध नाही. याचा परिणाम सल्फर आधारित खतांच्या पुरवठ्यावर झाला आहे, शिवाय याचे दर ५०% नी वाढले आहेत. सेमीकंडक्टर उद्योगात अत्यंत शुद्ध सल्फ्युरिक ॲसिड सिलिकॉन वेफर्सच्या उत्पादन प्रक्रियेत वापरलं जातं. त्याच्या टंचाईने ही प्रक्रिया धीमी पडत आहे. शिवाय इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरी उद्योगात कॉपर, निकेल, कोबाल्ट उत्पादनात सल्फ्युरिक ॲसिड अत्यावश्यक असल्याने सर्व ईव्ही उत्पादक कंपन्या सध्या चिंतेत आहेत. याचा परिणाम सरसकट सगळ्या बॅटरी उद्योगावर होणार आहे.

५. हेलियम शॉक आणि डिजिटल उद्योग : नैसर्गिक वायू प्रक्रियेदरम्यान उप-उत्पादन म्हणून हेलियम काढला जातो. जेव्हा एलएनजी उत्पादन थांबते, तेव्हा हेलियमचा पुरवठा बंद होतो. कतारमधील रास लाफान कॉम्प्लेक्सवर झालेल्या हल्ल्यांनंतर हेलियम उत्पादन ठप्पा आहे. इथे जगातील सर्वात जास्त हेलियम उत्पादन होतं. जागतिक पुरवठ्यापैकी सुमारे ३० ते ३६ टक्के भाग इथून पुरवला जातो. रास लफ्फान उत्पादन क्षमता कमी होणे अधिक लॉजिस्टिकच्या अडचणींमुळे हे संकट अधिक गंभीर झालं आहे. हॉर्मुझची स्ट्रेट पाश्चात्य जहाजांसाठी बंद झाल्यामुळे, हेलियमचे कंटेनर्स आखाती देशांत अडकून पडले आहेत. द्रव हेलियम क्रायोजेनिक स्टोरेजमध्ये असूनही सतत बाष्पीभूत होत असतो. जर हे कंटेनर अंदाजे ४५ दिवसांच्या आत हलवले गेले नाहीत, तर गॅस टँकर्स मधील मोठा भाग कायमचा नष्ट होतो. याचा परिणाम बाजारात आधीच दिसत असून, अति-शुद्ध हेलियमच्या किमती दोन आठवड्यांत दुप्पट झाल्या आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात अत्यंत महत्वाची एमआरआय स्कॅनिंग मशिन्स मधून निर्माण होणाऱ्या इमेज मध्ये स्पष्टता येण्यासाठी त्या मशीनमध्ये मॅग्नेट सतत गार रहावी लागतात. त्यासाठी अत्यंत कमी तापमान राहणं अतिशय आवश्यक असतं, ही फक्त हेलियम मुळे साध्य होतं. त्यामुळे हेलियम तुटवड्याचा यावर लगेच परिणाम होणार आहे.

तात्काळ आणि गंभीर परिणाम पूर्व आशियातील सेमीकंडक्टर उद्योगावर होत आहे. सेमीकंडक्टर बनवण्याच्या प्रक्रियेत हेलियम अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. सेमीकंडक्टर मधील वेफर्स थंड करण्यासाठी याचा वापर होतो. शिवाय व्हॅक्यूम सिस्टममध्ये गळती तपासण्यासाठी हे हेलियमला अन्य पर्याय उपलब्ध नाही. ५ नॅनोमीटरपेक्षा कमी असलेल्या चिप्समध्ये निर्माण प्रक्रियेत थोडी जरी उष्णता निर्माण झाली तरी उत्पादनात मोठी घट होऊ शकते किंवा उत्पादन पूर्णपणे थांबू शकते. दक्षिण कोरिया मधील चिप उद्योग यामुळे सध्या यामुळे याच संकटात आहे. कारण कोरिया आपल्या गरजेच्या दोन-तृतीयांश हेलियम कतारमधून आयात करतो. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स आणि एसके हायनिक्स सारख्या कंपन्यांनी, ज्या एआय एक्सिलेटरसाठी आवश्यक असलेल्या हाय-बँडविड्थ मेमरी पुरवठ्यात जगात आघाडीवर आहेत, त्यांनी आधीच हेलियम वाचवण्यासाठी पावले उचलायची सुरुवात केली आहे. २०२६ मध्ये यामुळे डिजिटल उपकरणे, विशेषतः मोबाईल हँडसेट, लॅपटॉप, टॅब्लेट सह सैनिकी आणि नागरी उपयोगाची ड्रोन यांच्यासह सध्या बोलबाला असलेलं एआय तंत्रज्ञान यांना कमी उत्पादन आणि वाढलेला खर्च अशा दुहेरी संकटांचा सामना करावा लागेल.

६. अल्युमिनियम टंचाई आणि बियर, सॉफ्ट ड्रिंक, मेडिकल उपकरणे आणि पॅकिंग उद्योग : बहरीन अल्युमिनियम कंपनी अल्बा ही जगातली एक प्रमुख अल्युमिनियम कंपनी आहे आणि जगातली सर्वात मोठी सिंगल साईट स्मेल्टिंग फॅसिलिटी म्हणून ओळखली जाते. इराणी हल्ल्याने या कंपनीने आपली तीन युनिट बंद केल्याने जागतिक पुरवठ्यात व्यत्यय आला त्यामुळे बियर आणि सॉफ्ट ड्रिंक कॅनचे दर वाढत आहेत. या पेयांना लागणाऱ्या काचेच्या बाटल्या सुद्धा गॅसच्या कमतरतेमुळे महाग झाल्या आहेत. याचा परिणाम ह्या पेयांची पॅकेजिंग २० ते ४०% महाग होण्यात होणार आहे. शिवाय औषध उद्योगात असलेली सर्जिकल उपकरणे, फॉइल्स आणि अन्नपदार्थ पॅकेजिंग मधील अल्युमिनियम वापराचे दरही महागणार आहेत. याचा एकाच वेळी अनेक उद्योगांवर परिणाम होणार आहे.

पेट्रोल, डिझेलची टंचाई आणि वाढलेले उद्योग हे दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीच्या किमतीवर परिणाम करणार आहेत. अजून भारतात म्हणावे तसे दर वाढलेले नाहीत पण लवकरच ते वाढतील. जेट फ्युएल दर वाढणार आहेतच त्यामुळे विमान प्रवास महाग होईल. अन्नधान्य, भाजीपाला, दूध, शिक्षण, रोजगार यात इंधन दरवाढ मोठा परिणाम करणार आहे. प्लास्टिक टंचाई आणि महाग प्लॅस्टिक मुळे पॅकेजिंग महाग होईल याने ईकॉमर्स कंपन्या, तयार अन्नाची होम डिलिव्हरी यांना दणका बसेल. गृहउद्योग, लघु उद्योग यात सर्वाधिक फटका खातील. भारताच्या कानाकोपऱ्यात फोफावलेला घरगुती पर्यटन उद्योग, बांधकाम उद्योग हा सुद्धा मोठ्या संकटात जाईल. यामुळे सामूहिक शहाणपणा आणि खबरदारी याची गरज निर्माण झालेली आहे. सरकारने कोरोना समस्येची आठवण करून देण्याच्या मागे हेच मोठं कारण आहे कारण लांबलेलं युद्ध आपल्याला कदाचित कोरोना विसरायला लावेल इतका काळ आणि त्यापेक्षा मोठ्या अडचणी निर्माण करू शकते!

## थोडक्यात पण महत्वाचे




### डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक विस्तारीकरणाला गती

- जागा हस्तांतरणासाठी प्रयत्न; तांत्रिक प्रक्रिया लवकर पूर्ण होणार

पुणे (आरंभ पर्व) : मंगळवार पेठेतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या विस्तारीकरणाचा प्रश्न लवकर सोडवण्यासाठी महापालिका प्रशासन सक्रिय झाले आहे. राज्य सरकारच्या रस्ते विकास महामंडळाच्या मालकीची जागा पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करून त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिष्ठेला साजेसं भव्य स्मारक उभारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. रिपब्लिकन पक्षाचे नेते व पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्तांची भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली. यावेळी बाळासाहेब जानराव, राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे, उमेश कांबळे, जयदेव रंधवे आदी पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत राज्य सरकारकडून स्मारकाबाबत सकारात्मक विचार सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. त्यामुळे स्मारक उभारणीच्या प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला. तसेच आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता शक्य तितक्या लवकर करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.


### भगवान महावीर स्वामींच्या २६२५व्या जन्मकल्याणकानिमित्त भव्य उत्सव

- रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त दिवसभर दर्शन; सायंकाळी महाआरती व दिमाखदार वरघोडा




पुणे (आरंभ पर्व) : पुण्यातील तुळशीबाग-मंडई परिसर जैन संघाच्या वतीने भगवान महावीर स्वामींच्या २६२५व्या जन्मकल्याणकानिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा प्रभूंच्या दर्शनी मूर्तीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याने उत्सवाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या निमित्ताने भगवान महावीर स्वामींची आकर्षक व दर्शनीय मूर्ती तयार करून ती दिवसभर मंडई परिसरात दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे. जैन समाजाबरोबरच इतर नागरिकांनाही प्रभूंचे दर्शन घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. सायंकाळी प्रभूंची भव्य महाआरती आयोजित करण्यात येणार असून “कौन बनेगा भाग्यशाली” या लकी ड्रॉचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच लक्ष्मी रोडवरून दिमाखदार वरघोडा काढण्यात येणार असून, मागील २५ वर्षांपासून पुणे सकल संघाच्या वरघोड्यात या मंडळाचा बक्षीसपात्र सहभाग राहिला आहे. उत्सवाबाबत माहिती देताना मोहन साखरिया यांनी सांगितले की, तुळशीबाग-मंडई परिसर जैन संघाच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून प्रभूंच्या दर्शनी मूर्तीला यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. हा उत्सव जैन समाजाच्या श्रद्धा आणि एकात्मतेचे प्रतीक असून अधिकाधिक भक्तांनी उपस्थित राहून दर्शन, आरती व वरघोड्यात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

# पुण्याचे लाडके ‘शौकीन फॅमिली पान’ खेड शिवापूरमध्ये



## ५० हून अधिक चवींची आकर्षक मेजवानी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्याच्या समृद्ध खाद्यसंस्कृतीत वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या ‘शौकीन फॅमिली पान’ या उपक्रमाने विस्ताराच्या नव्या टप्प्यात प्रवेश केला आहे. शहरातील नळ स्टॉप येथून सुरू झालेल्या या लोकप्रिय पान उपक्रमाची २८ मार्च २०२६ रोजी खेड शिवापूर येथे नव्या शाखेच्या उद्घाटनाने भर पडली आहे. पुणे-बंगळूर महामार्गावरील हॉटेल जगदंबा परिसरात ही शाखा सुरू करण्यात आली आहे.

‘शौकीन पान’चे वैशिष्ट्य म्हणजे येथे उपलब्ध असलेली सर्व पाने शंभर टक्के तंबाखूमुक्त असून ती नैसर्गिक घटकांपासून तयार केली जातात. त्यामुळे आरोग्यदायी व सुरक्षित पर्याय म्हणून ग्राहकांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

या ठिकाणी पारंपरिक विड्यांसह ‘फायर पान’, ‘चॉकलेट पान’ आणि ‘गोल्ड लीफ पान’ अशा ५० हून अधिक विविध चवींची मेजवानी उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, पुण्यातील पहिले ‘फॅमिली पान शॉप’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या उपक्रमात महिलांसाठी व लहान मुलांसाठी स्वच्छ, सुरक्षित आणि आनंददायी वातावरण उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सध्या पुण्यात कोथरूड, बाणेर, हडपसर, वाकड, सिंहगड रस्ता, बावधन तसेच पिंपरी-चिंचवड परिसरात या पान उपक्रमाच्या शाखा कार्यरत आहेत. याशिवाय मुंबईतील दादर येथेही या उपक्रमाने यशस्वी पाऊल ठेवले आहे.

सन २००५ मध्ये उद्योजक शरद मोरे यांनी सुरू केलेल्या या उपक्रमाने पारंपरिक पानाला ‘मिष्टान्न पान’ अशी नवी ओळख दिली आहे. बदलत्या ग्राहकांच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन ‘शौकीन पान’ आता ऑनलाईन माध्यमावरही उपलब्ध असून ग्राहकांना घरपोच सेवेद्वारे या विशेष पानांचा आस्वाद घेता येत आहे.

खेड शिवापूरमधील नव्या शाखेमुळे ‘शौकीन फॅमिली पान’चा विस्तार अधिक बळकट झाला असून भविष्यात महाराष्ट्रासह देशभरात विस्तार करण्याचा मानस व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

## तडीपार गुंडाची पुण्यात बाईक रॅली, परिसरात भीतीचे वातावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरात कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. पुणे शहर व जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलेल्या गुंडानेच पोलिसांच्या नाकावर टिच्चून बाईक रॅली काढत परिसरात दहशत निर्माण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. खराडी परिसरात रामनवमीच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमादरम्यान आरोपी निखिल मधुकर कांबळे (वय 23, रा. लक्ष्मीनगर, येरवडा) हा आपल्या समर्थकांसह मोठ्या आवाजात गाणी वाजवत दाखल झाला. “डॉन आहे मी, बाप आहे मी” आणि “रगेलच्या नादी लागू नका” असे डायलॉग देत त्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे, आरोपीवर यापूर्वीही गंभीर गुन्हे दाखल असून त्याच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली होती. तरीही तो उघडपणे फिरताना दिसत असल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आरोपीचे काही साथीदारही मोक्का अंतर्गत गुन्ह्यांमध्ये फरार असल्याची माहिती समोर येत आहे.

## अवैध दारू, जुगार व गांजा विक्रीविरोधात ग्रामस्थ आक्रमक

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

बार्शी तालुक्यातील अंबाबाईची वाडी (जवळगाव नं. २) व ज्योतीबाची वाडी परिसरात सुरू असलेल्या अवैध दारू, जुगार व गांजा विक्रीविरोधात ग्रामस्थांनी तीव्र संताप व्यक्त करत संबंधित प्रशासनाकडे तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा सरचिटणीस नागेश अभिमन्यू चव्हाण यांनी मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलीस महासंचालक तसेच संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. गेल्या काही महिन्यांपासून या भागात उघडपणे दारू विक्री, जुगार आणि गांजाची विक्री



सुरू असल्याचे ग्रामस्थांनी निदर्शनास आणून दिले आहे. विशेष म्हणजे, या सर्व प्रकारांकडे स्थानिक पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

यामुळे परिसरातील तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, सामाजिक आणि कौटुंबिक समस्या वाढत आहेत. ग्रामस्थांच्या मते, या अवैध व्यवसायामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. तसेच गावातील शांतता आणि विकास प्रक्रियेलाही मोठा अडथळा निर्माण होत आहे. यापूर्वी ग्रामपंचायतीनेही यासंदर्भात ठराव करून प्रशासनाला कारवाईची विनंती केली होती.

मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

यामुळे संतप्त ग्रामस्थांनी येत्या काळात आंदोलनाचा इशारा दिला असून, महिलाही मोठ्या संख्येने यात सहभागी होणार असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रशासनाने तात्काळ लक्ष देऊन अवैध धंद्यांवर बंदी घालावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# गीतेतील तत्त्वज्ञानानुसार जीवन जगावे : डॉ. रवींद्र भोळे

## उरुळी कांचन येथे ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

“भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये मनुष्याचे कर्म, धर्म आणि जीवनमूल्यांचे सखोल विवेचन केले आहे. गीतेतील तत्त्वज्ञानानुसार जीवन जगल्यास मनुष्याला योग्य मार्ग सापडतो,” असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक व प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे यांनी केले.



उरुळी कांचन येथील राम मंदिरात श्री उरुळी कांचन देवस्थान संस्था, भैरवनाथ सेवा समिती, ग्रामपंचायत उरुळी कांचन तसेच श्रीराम जन्मोत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने डॉ. भोळे यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले.

प्रवचनात बोलताना डॉ. भोळे म्हणाले की, गीतेमध्ये परमात्मा, सृष्टी, जीव, कालचक्र आणि कर्म यांचे ब्रह्मज्ञान स्पष्ट करण्यात आले आहे. कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग आणि समत्वभाव या तत्त्वांच्या माध्यमातून मनुष्याला योग्य जीवनमार्ग दाखविण्याचे कार्य गीता करते. गीतेतील विचार हे केवळ अध्यात्मिक नसून मानसिक आरोग्य आणि संतुलित जीवनासाठीही मार्गदर्शक आहेत. ते पुढे म्हणाले, “जीवनात धर्म, नीती, न्याय, विवेक, सद्बुद्धी आणि सत्य यांचा अवलंब करणाऱ्यांचा नेहमी विजय होतो, तर अनीती, अधर्म आणि असत्याचा मार्ग स्वीकारणाऱ्यांचा नाश अटळ आहे. भगवान श्रीकृष्णाच्या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी केल्यामुळे पांडवांचा विजय झाला, तर दुष्ट प्रवृत्तीमुळे कौरवांचा पराजय झाला, हे याचेच उदाहरण आहे.” गीतेचे भक्तिभावाने चिंतन, मनन आणि अध्ययन केल्यास मनःशांती, समाधान आणि परमानंदाची अनुभूती मिळते. जिथे धर्म असतो, तेथेच जय असतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास ह.भ.प. तुकाराम कांचन, ह.भ.प. सुरेश कांचन, ह.भ.प. पुंडलिक कांचन, ह.भ.प. रोहित मुरकुटे, नाना कोंडे, प्रमिलाताई तळेकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्रीराम जन्मोत्सवानिमित्त आयोजित या सप्ताहामध्ये अक्षय महाराज रोडे, नाना महाराज काळे, नीताताई महाराज कांचन, सुनिता ताई महाराज कुंजीर, प्रमिलाताई महाराज तळेकर आणि डॉ. रवींद्र भोळे महाराज यांच्या प्रवचनांचे आयोजन करण्यात आले. तसेच संभाजी महाराज आपुणे, डॉ. तुकाराम महाराज उराळे, सुनील महाराज शिंदे, भारतीताई महाराज गाडेकर, बाळू महाराज आहेर, गणेश महाराज भगत, शारदाताई सूर्यवंशी महाराज, गणेश महाराज पाटील, बाळकृष्ण महाराज डांगे आणि रमेशानंदजी महाराज जाधव यांच्या कीर्तनांनी वातावरण भक्तिमय झाले.







दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
मंगळवार, दि. ३१ मार्च २०२६









# फक्त मुस्लिमांचा द्वेष करणे म्हणजे हिंदुत्व नव्हे

## समाजातील ध्रुवीकरणाच्या पार्श्वभूमीवर विचार करण्याची गरज

**(दै. आरंभ पर्व)**

**भारत २०२६ मध्ये पोहोचला, पण काहींची मानसिकता अजूनही भूतकाळात अडकलेली दिसते. देशात वारंवार एकच चित्र दिसत आहे. प्रत्येक समस्येसाठी एकाच समाजाला जबाबदार धरणे. प्रश्न विचारला पाहिजे: हे खरोखरच हिंदुत्व आहे का, की हिंदुत्वाच्या नावाखाली द्वेषाची राजकारण?**




**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**

आज "हिंदुत्व" हा शब्द ज्या पद्धतीने वापरला जातो, तो मूळ संकल्पनेपासून दूर गेलेला दिसतो. सहिष्णुता, समावेशकता आणि सर्वधर्मसमभाव हे हिंदुत्वाचे आधारस्तंभ होते. पण आता काही जणांनी त्याचे रूपांतर एका समुदायाविरोधात उभ्या केलेल्या भिंतीत केले आहे. ही केवळ विकृती नाही, तर समाजाला फोडण्याची धोकादायक प्रक्रिया आहे.

देशात घडणाऱ्या प्रत्येक घटनेत मुस्लिम समाजाला लक्ष्य करणे, सोशल मीडियावर द्वेषपूर्ण मोहिमा राबवणे, अफवा पसरवणे हे सर्व थांबले पाहिजे. कोणत्याही एका समाजाला सतत संशयाच्या नजरेतून पाहणे ही केवळ अन्यायकारक बाब नाही, तर देशाच्या एकात्मतेलाच धोका निर्माण करणारी प्रवृत्ती आहे.

हे लक्षात ठेवले पाहिजे की, भारताची ओळख ही विविधतेतून निर्माण झालेली आहे. इथे प्रत्येक धर्म, प्रत्येक समुदाय या राष्ट्राच्या उभारणीत समान वाटा उचलतो. त्यामुळे एका समाजाला लक्ष्य करून देश मजबूत होत नाही, उलट कमकुवत होतो. राजकारणाच्या पातळीवरही या मुद्द्याचा वापर होत असल्याचे स्पष्ट दिसते. मतांसाठी समाजात भीती, अविश्वास आणि द्वेष पसरवणे ही अत्यंत धोकादायक खेळी आहे. पण याचा सर्वात मोठा फटका सामान्य नागरिकांना बसतो. जे शांततेत, सुरक्षिततेत आणि सन्मानाने जगू इच्छितात.

आज गरज आहे ती स्पष्ट भूमिका घेण्याची. हिंदुत्वाच्या नावाखाली द्वेष पसरवणाऱ्यांना समाजाने थेट प्रश्न विचारले पाहिजेत. तुम्ही कोणत्या हिंदुत्वाबद्दल बोलता? सहिष्णुतेच्या, की द्वेषाच्या?

भारतीय राज्यघटना प्रत्येक नागरिकाला समान हक्क देते. कायदा कोणाच्याही विरोधात नाही आणि कोणाच्याही बाजूनेही नाही तो न्यायाच्या बाजूने आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारचा अन्याय, कोणत्याही समाजावर होत असेल, तर त्याविरोधात आवाज उठवणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

द्वेषाची आग पेटवणे सोपे असते, पण ती विझवण्यासाठी पिढ्या खर्च होतात. म्हणूनच आज निर्णय घ्यावा लागेल. आपण विभाजनाच्या मार्गावर जाणार आहोत की एकतेच्या?

हिंदुत्व जर खरोखरच मूल्यव्यवस्था असेल, तर त्यात द्वेषाला जागा नाही. आणि जर कुणी द्वेषाला हिंदुत्व म्हणत असेल, तर त्याला विरोध करणे हीच खरी राष्ट्रभक्ती ठरेल.

# स्टाईल आयकॉन हृतिक रोशन ONN चा ब्रँड ॲम्बेसेडर




**कोलकाता (दै. आरंभ पर्व)**

देशातील आघाडीची इनरवेअर कंपनी लक्स इंडस्ट्रीज लिमिटेड ने आपल्या प्रीमियम वेअर ब्रँड ONN साठी बॉलिवूड अभिनेता हृतिक रोशन यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर केली आहे. या निर्णयाद्वारे कंपनी भारतातील वेगाने वाढणाऱ्या प्रीमियम इनरवेअर आणि थर्मल वेअर बाजारपेठेत आपली पकड अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

कंपनीच्या मते, ही भागीदारी ONN ब्रँडची ओळख अधिक बळकट करण्यासोबतच विशेषतः युवा आणि महत्त्वाकांक्षी ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवण्याच्या धोरणाचा भाग आहे. ONN ला आधुनिक लाइफस्टाइल ब्रँड म्हणून सादर करण्यात आले असून, तो कम्फर्ट, परफॉर्मन्स आणि स्टाईल यांचा संतुलित अनुभव देतो.

अशोक तोडी, चेअरमन, लक्स इंडस्ट्रीज यांनी सांगितले की, ही भागीदारी कंपनीच्या पोर्टफोलिओमध्ये प्रेरणादायी आणि मजबूत ब्रँड उभारण्याच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. ONN हा नवीन पिढीसाठी आधुनिक डिझाइन, अधिक आराम आणि स्टाईल देण्याच्या कंपनीच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतो आणि हृतिक रोशन यांचे व्यक्तिमत्त्व व फिटनेस ब्रँडच्या मूल्यांशी सुसंगत आहे.

तर साकेत तोडी, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, लक्स इंडस्ट्रीज यांच्या मते, या सहकार्यामुळे ब्रँडची दृश्यता वाढेल आणि प्रीमियम तसेच परफॉर्मन्स-आधारित इनरवेअर शोधणाऱ्या ग्राहकांशी अधिक दृढ नातं निर्माण होईल. या सहकार्याबाबत प्रतिक्रिया देताना Hrithik Roshan (हृतिक रोशन) यांनी सांगितले की, वैयक्तिक स्टाईलची पायाभूत गोष्ट म्हणजे आराम आणि आत्मविश्वास. ONN चा गुणवत्ता, नवकल्पना आणि आधुनिक डिझाइनवरील भर त्यांच्या लाइफस्टाइलशी जुळणारा आहे.

या मोहिमेत ते टीव्ही, डिजिटल प्लॅटफॉर्म, रिटेल आणि आउटडोअर माध्यमांवर विविध जाहिरात उपक्रमांमध्ये दिसणार आहेत. या मोहिमेची निर्मिती रेडिफ्यूजन ब्रँड सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांनी केली आहे.

प्रमोद शर्मा, नॅशनल क्रिएटिव्ह डायरेक्टर, रेडिफ्यूजन यांनी सांगितले की, ONN हा स्टाईल, परफॉर्मन्स आणि दैनंदिन आराम यांचा उत्कृष्ट संगम आहे आणि हृतिक रोशन हे या सर्व गुणांचे अचूक प्रतिनिधित्व करतात. देशभरातील मल्टी-चॅनल प्लॅटफॉर्मवर ही मोहीम सुरू करण्यात येत असून, त्यामुळे ONN ची पोहोच स्टाईल-जागरूक युवा ग्राहकांपर्यंत अधिक मजबूत होणार आहे. या नव्या भागीदारीमुळे लक्स इंडस्ट्रीज लिमिटेड ONN ब्रँडच्या वाढीस गती देत प्रीमियम सेगमेंटमध्ये आपली स्थिती अधिक भक्कम करण्याच्या दिशेने पुढे जात आहे.






## थोडक्यात पण महत्वाचे



### रामनामाच्या गजरात भक्तीमय श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

पुणे (आरंभ पर्व) : मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांच्या पावन जन्मोत्सवानिमित्त श्रीराम सेवा समितीच्या वतीने पुण्यात अत्यंत भक्तीमय, आध्यात्मिक आणि उत्साहपूर्ण वातावरणात श्रीराम जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. 'श्रीराम जय राम जय जय राम' या अखंड नामस्मरणाने परिसर दुमदुमून गेला होता. रामभक्तीच्या या दिव्य सोहळ्यात शेकडो भाविकांनी उपस्थित राहून भक्तिरसाचा आनंद लुटला. अल्पबचत भवन येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चार आणि पारंपरिक विधींनी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रभू श्रीरामांचे विधिवत पूजन करण्यात आले. ईश्वरचंद गोयल, जयभगवान गोयल, पवन बंसल, पवन चमडिया, गुंजन नवाल, नरेंद्र गोयल, प्रेम मित्तल, सतीश अग्रवाल, योगेश जैन, पवन सराफ, आनंद अग्रवाल, राकेश अग्रवाल, रितेश अग्रवाल, गीता गोयल, रुची गोयल, राजेश मित्तल, सुनीता बंसल, नंदलाल पूरनचंद , द्वारका जालन यांच्यासह पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कोरेगाव पार्कमधील कोट्यवधींच्या संपत्तीमुळे खरातचा सीए रडारवर

पुणे (आरंभ पर्व) : भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणाला आता आर्थिक घोटाळ्याची नवी कलाटणी मिळत आहे. अशोक खरातशी संबंधित आर्थिक व्यवहारांची चौकशी पोलिसांनी वेगाने सुरू केली असून, त्यात भोंदू बाबा खरातचा सीए प्रकाश पोफळे हेही तपासाच्या केंद्रस्थानी आले आहे अधिकच्या माहितीनुसार, प्रकाश पोफळे यांच्यावर मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप होत आहेत. विशेषतः कोरेगाव पार्क या पुण्यातील उच्चभ्रू परिसरातील मालमत्तेच्या व्यवहारामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील 150 कोटींची मालमत्ता संशयाच्या भोवऱ्यात आली आहे कोरेगाव पार्क परिसरात सुमारे 49 गुंठे जागेवर तब्बल 18 रो हाऊस पोफळे यांच्या पत्नीच्या नावावर असल्याचे उघड झाले आहे. या मालमत्तेची अंदाजे किंमत 150 कोटी रुपयांपेक्षा अधिक असल्याची चर्चा आहे. मात्र, कागदोपत्री ही मालमत्ता 2024 मध्ये फक्त 19 कोटी रुपयांना खरेदी केल्याचे दाखवण्यात आले आहे. बाजारभाव आणि दाखवलेल्या किंमतीत मोठी तफावत असल्याने व्यवहार संशयास्पद मानला जात आहे. या मालमत्तेच्या परिसरात देशातील अनेक नामांकित उद्योगपतींचे बंगले आहेत.दरम्यान, सीए प्रकाश पोफळे यांच्याकडे एवढा मोठा निधी कुठून आला? या व्यवहारामागे अशोक खरात यांचा पैसा आहे का? की यामध्ये राजकीय आर्थिक साखळीचा सहभाग आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

# मॉन्ट्रा इलेक्ट्रिकचा महाराष्ट्रात विस्तार : डीलरशिपचे अनावरण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



वैविध्यपूर्ण मुरुगप्पा समूहाची क्लीन मोबिलिटी शाखा असलेल्या मॉन्ट्रा इलेक्ट्रिकने पुण्यात आपल्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्रॅक्टर (ई-२७) डीलरशिपच्या उद्घाटनाने प्रवेश केला आहे. जागतिक भू-राजकीय परिस्थितीमुळे पारंपरिक इंधन पुरवठा साखळी आणि किंमतींबाबत अनिश्चितता निर्माण होत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी डिझेल हा मुख्य घटक राहिला आहे. त्यामुळे मॉन्ट्रा इलेक्ट्रिकचा ई-२७ हे एक शाश्वत आणि व्यवहार्य पर्याय म्हणून काम करतो. तो खर्चावर नियंत्रण देऊन इंधनावर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी करू शकतो. कृषी आणि औद्योगिक अशा एकत्रित मागणीमुळे तो पुणे प्रदेश बाजारपेठेत एक महत्त्वपूर्ण संधी सादर करणार आहे. बारामती, इंदापूर, जुन्नर आणि शिरूर अशा कृषीवर आधारित क्षेत्रांमध्ये शेती, मालवाहतूक आणि संबंधित कामांमध्ये वापरल्या जाणाऱ्या ट्रॅक्टरची स्थिर मागणी निर्माण होते. त्याचवेळी चाकण, पिंपरी-चिंचवड, वाघोली आणि पुणे शहरसारखी वेगाने विकसित होत असलेली औद्योगिक केंद्रे बांधकाम, रसद आणि पायाभूत सुविधांच्या कामासाठी ट्रॅक्टरचा वापर करतात. ग्रामीण उत्पादकता आणि शहरी-औद्योगिक वाढीचे हे संयोजन संपूर्ण प्रदेशातील ट्रॅक्टरसाठी शाश्वत आणि वैविध्यपूर्ण मागणी परिसंस्था तयार करते.

चौगुले इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेडद्वारे संचालित पुणे डीलरशिप मॉन्ट्रा इलेक्ट्रिकच्या ई-२७ या भारतातील पहिल्या एआरएआय-प्रमाणित इलेक्ट्रिक ट्रॅक्टरची किरकोळ विक्री करेल आणि या प्रदेशातील ग्राहकांसाठी सातत्यपूर्ण अपटाइम आणि मालकी विश्वासार्हतेस समर्थन देण्यासाठी समर्पित विक्री आणि सेवा पायाभूत सुविधांनी सुसज्ज आहे.






# एस. पी. कॉलेज चौकात गुलाबो गँगचे तीव्र आंदोलन

## भोंदू बाबाविरोधात कठोर कारवाईची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**







शहरातील एस.पी. कॉलेज चौकात आज गुलाबो गँगच्या वतीने स्वयंघोषित भोंदू बाबा अशोक खरात याच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात आले. महिलांची फसवणूक, अंधश्रद्धेच्या नावाखाली मानसिक व सामाजिक शोषण केल्याचा आरोप करत आंदोलकांनी संताप व्यक्त केला.

या आंदोलना दरम्यान प्रतीकात्मक तिरडी काढण्यात आली. तसेच निषेध म्हणून संबंधित व्यक्तीच्या प्रतिमेला काळे फासण्यात आले आणि चपलांचा हार घालून तीव्र निषेध नोंदवण्यात आला. आंदोलनकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत प्रशासनाला तातडीने कारवाई करण्याचा इशारा दिला. यावेळी आंदोलकांनी काही ठोस मागण्या मांडल्या. त्यामध्ये अशोक खरात याच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी व कठोर कायदेशीर कारवाई करावी, रूपाली चाकणकर यांना सहआरोपी म्हणून चौकशी करून अटक करावी, तसेच या प्रकरणात नैतिक जबाबदारी स्वीकारत नीलम गो-हे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, या प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

हे आंदोलन पायल तिवारी बिटिया फाउंडेशन व गुलाबो गँगच्या अध्यक्षा संगीता तिवारी यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, "महिलांच्या आयुष्याशी खेळणाऱ्यांना आम्ही माफ करणार नाही. कायदा आणि प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील."

दरम्यान, या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे. तसेच आंदोलनकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर पोस्टकार्ड मोहिम राबवूनही न्याय मिळवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. या आंदोलनात शोभना पण्णिकर, पूजा पाटील चव्हाण, प्रिया पाटील सूर्यवंशी, सोनिया ओव्हाळ, सारिका शिंदे, भारती लोंढे, पारूल ताई, शुभा वाफारे, मालन चव्हाण, सुवर्णा माने, शुभांगी वखारे यांच्यासह अनेक महिला कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवला. जर तात्काळ कारवाई झाली नाही, तर येत्या काळात राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला असून प्रशासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



## पत्रकारिता प्रभावी माध्यम : वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे

**उरुळी कांचन(आरंभ पर्व) : पत्रकारिता ही लोकशिक्षण व समाजशिक्षणाचे प्रभावी माध्यम असून काळानुरूप तिच्या स्वरूपात बदल होत गेले असले तरी तिची ताकद आजही कायम असल्याचे मत उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी व्यक्त केले. महासुपर फास्ट जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी त्यांनी पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधत शुभेच्छा दिल्या. वांगडे म्हणाले, बदलत्या काळात पत्रकारितेचे स्वरूप बदलले असले तरी ग्रामीण आणि शहरी भागात पत्रकार समाजातील विविध घटकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडत आहेत. सामाजिक बांधिलकी जपत पत्रकार नव्या आयामांना पुढे नेत असून त्यांच्या कार्यावर समाजाचा विश्वास कायम आहे. कार्यक्रमाच्या प्रारंभी महासुपर फास्टच्या संपादिका सुवर्णा कांचन यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. या प्रसंगी ज्येष्ठ पत्रकार तथा मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय अध्यक्ष एम. जी. शेलार, महानुभाव पंथाचे महंत गोपालव्यास कपाटे, पंचायत समिती सदस्या कोमल कांबळे, बायफ संस्थेच्या प्रकल्प प्रमुख डॉ. लता शर्मा, पुणे दख्खन संस्थेचे विश्वस्त खलिल शेख, शरद खेडेकर, प्रताप कांचन, मच्छिंद्र कड, गणेश तांबे, अनिरुद्ध मराठे, संजय कोतवाल, शुभम काळे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. रवींद्र भोळे, निवेदिका ईशा आबनावे, पत्रकार सहदेव खंडागळे, बापू चौधरी, किरण भंडारी, उमेश म्हेत्रे, गणेश कांबळे, शिवराज साने, राष्ट्रीय खेळाडू धनंजय मदने, अनिल कदम, अंबिका तांबे, विपुल कोतवाल आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुवर्णा कांचन यांनी केले. सूत्रसंचालन सुनील तुपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन महंत गोपालव्यास कपाटे यांनी मानले.**




## बौद्धिकदृष्ट्या अक्षम व्यक्तींसाठी सर्वसमावेशक लाभांची मागणी

**पुणे (आरंभ पर्व) : बौद्धिकदृष्ट्या अक्षम असलेल्या दिव्यांग व्यक्तींसाठी सर्वसमावेशक लाभ योजना लागू कराव्यात तसेच त्यांच्या आजीवन देखभालीसाठी शासनाने ठोस पाठिंबा द्यावा, अशी मागणी पालक संघटनांतर्फे करण्यात आली. पुण्यात नॅशनल सेंटर फॉर प्रमोशन ऑफ एम्प्लॉयमेंट फॉर डिसेबल पीपल (एनसीपीईडीपी) आणि बौद्धिकदृष्ट्या अक्षम व्यक्तींच्या पालक संघटनांचा राष्ट्रीय महासंघ 'परिवार' यांच्या संयुक्त विद्यमाने प्राईड हॉटेल येथे आयोजित बैठकीत ही मागणी पुढे आली. या चर्चासत्रात महाराष्ट्रभरातील विविध हितधारक सहभागी झाले होते. बैठकीत बौद्धिक अक्षमता आणि आत्मकेंद्रित विकार असलेल्या व्यक्तींसह तात्पुरते दिव्यांगत्व प्रमाणपत्र धारकांना सरकारी योजनांच्या कक्षेत समाविष्ट करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. अशा व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबियांना भेडसावणाऱ्या अडचणी, तसेच या स्थितींचे गुंतागुंतीचे आणि सतत बदलणारे स्वरूप यावरही सविस्तर चर्चा झाली.**




# जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालयचे उद्घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील सुखसागर परिसरात गोरगरीब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी उभारण्यात आलेल्या जडाबाई दुगड शिक्षण संकुल येथे संगणक कक्ष आणि ग्रंथालय चे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. लेडीज सर्कल इंडिया यांच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती शीशम सबरवाल आणि क्षेत्र अध्यक्षा श्रीमती मेघा राठी यांच्या हस्ते या अत्याधुनिक लॅबचे उद्घाटन करण्यात आले.




या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गौरव दुगड आणि मोनल दुगड उपस्थित होते. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा राजाराम भोसले, पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 चे अध्यक्ष अश्विन संघवी, पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 च्या अध्यक्षा सुमन पोरवाल, सचिव वीनीता खाटर, कोषाध्यक्ष विनिता ओसवाल यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात बोलताना संस्थेच्या सचिव मोनल दुगड यांनी सांगितले की, "सुमारे 40 वर्षांपूर्वी गोरगरीब मुलांसाठी सुरू केलेली ही शाळा आज मोठ्या प्रमाणात विकसित झाली आहे. येथे सेमी-इंग्लिश माध्यम सुरू करण्यात आले असून कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्याचा आमचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आता लायब्ररी आणि संगणक लॅबची भर घालण्यात आली आहे." ही संस्था कै माणिकचंद नारायणदास दुगड यांनी सुरू केली असून सध्या प्रमोद माणिकचंद दुगड हे चेअरमन म्हणून कार्यरत आहेत. तर गौरव दुगड उपाध्यक्ष आणि मोनल दुगड सचिव पदावर कार्यरत आहेत. संस्थेच्या माध्यमातून सुखसागर परिसरात विविध सामाजिक उपक्रम राबवले जात आहेत.

यावप्रसंगी शीशम सभरवाल यांनी या संयुक्त प्रयत्नांचे कौतुक केले आणि मानवी जीवनात परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तंत्रज्ञान आणि पुस्तकांची उपलब्धता कशा प्रकारे संधींमधील तफावत भरून काढू शकते आणि विद्यार्थ्यांसाठी एक उज्वल भविष्य घडवू शकते, यावर त्यांनी प्रकाश टाकला. नव्याने उभारण्यात आलेला संगणक कक्ष मुलांना आवश्यक डिजिटल कौशल्ये विकसित करण्यास मदत करेल, तर ग्रंथालय संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय आणि आजीवन शिकण्याची वृत्ती जोपासण्यास हातभार लावेल अशी अपेक्षा आहे. दीर्घकालीन सकारात्मक प्रभाव निर्माण करणाऱ्या सामाजिक कार्यांमध्ये योगदान देताना दोन्ही संस्थांच्या सदस्यांनी आपला अभिमान व्यक्त केला. खऱ्या अर्थाने सक्षमीकरण हे केवळ शिक्षणच नव्हे, तर स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून दिल्यानेच साध्य होते, या आपल्या विश्वासाचा त्यांनी पुनरुच्चार केला. या उपक्रमासाठी पुणे कॉस्मोपोलिटन राऊंड टेबल 110 आणि पुणे कॉस्मोपोलिटन लेडीज सर्कल 81 यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच मोहित गलानी, भावना गलानी, पूर्वा संघवी, प्रीती कटारिया आदी मान्यवरांचीही उपस्थिती होती.

## टोईंगने आपली पकड केली मजबूत, खाण्याचे पर्याय उपलब्ध

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

स्वस्त दरात फूड डिलीव्हरी करणारे ॲप टोईंगने आज जाहीर केले की, गेल्या 6 महिन्यात त्यांना ग्राहकांचा खूप चांगला प्रतिसाद मिळाला आहे. टोईंग आपल्या ॲपवर खाण्यापिण्याच्या वस्तूंवर सर्वात कमी किमतीचे आश्वासन देते आणि हॉटेलमधील मेनू कार्डपेक्षा कमी किंवा त्याच्या बरोबरीने दर देण्याची खात्री देते. कंपनीने देशभरातील 3700 पेक्षा जास्त हॉटेल्सचे नेटवर्क तयार करून शहरात आपली पकड मजबूत केली आहे, ज्यामध्ये 300 प्रकारच्या डिश श्रेणींमधील 1,00,000 पेक्षा जास्त खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. बाजारात उपलब्ध असलेले टोईंग हे सर्वात स्वस्त दरात फूड डिलीव्हरी करणारे ॲप आहे. गेल्या 7 महिन्यात टोईंगचा विस्तार भारतातील 18 शहरांमध्ये झाला आहे. हे ॲप आग्रा, वडोदरा, गुवाहाटी, नाशिक, नागपूर, पटना, औरंगाबाद, भोपाळ, दिल्ली, गुरुग्राम, नोएडा, फरीदाबाद, गाझियाबाद, मुंबई, चंदीगड आणि अहमदाबादमध्ये सुरू झाले आहे. सर्वात कमी किमतीचे आश्वासन देण्यासोबतच, टोईंगवर कोणत्याही ऑर्डरसाठी पॅकेजिंग शुल्क किंवा प्लॅटफॉर्म फी घेतली जात नाही. ग्राहक बिर्याणी, बर्गर आणि बाऊल्स यांसारखे विविध पदार्थ 99 रूपयांपेक्षा कमी किमतीत ऑर्डर करू शकतात.

# राजगुरूनगरमध्ये काव्यदिनी कवितेचा जागर

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक कविता व वनदिनाचे औचित्य साधून येथील महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा व वनविभाग खेड यांच्या संयुक्त विद्यमाने काव्यमैफीलीचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई, पुणे, कोल्हापूर, अहिल्यागर, परभणी बुलढाणा आदी जिल्ह्यातुन आलेल्या सुमारे ६० कवींनी झाडे, पर्यावरण, निसर्ग, प्रेम व सामाजिक विषयांवर कविता सादर केल्या. येथील देशपांडे वाडा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास ज्येष्ठ कवी म.भा.चव्हाण, आय.एफ.एस. अधिकारी लोकेश पाटील, वनाधिकारी यादव जाधव, पुरुषोत्तम सदाफुले, प्राचार्य संभाजी मलघे, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, रोटरी क्लबचे राजन जांभळे, भाजपा सचिव अभय काळे, पत्रकार निलेश आंधळे व साहित्य परिषदेचे अध्यक्ष संतोष गाढवे उपस्थित होते. यावेळी रमेश खरमाळे(पर्यावरण), लक्ष्मण शिंदे (वनसेवा), बापुराव गर्जे(आरोग्य), दत्ता सुकाळे(काव्य) व शैला जांभळकर/गावडे(काव्य) यांना पुरस्कारांनी गौरविण्यात आले. तसेत प्रा.सुभाष साळुंके यांच्या प्रबोधन व यशाची चावी या पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सर्व सहभागी कवींना सन्मानचिन्ह व पुस्तक देऊन गौरविण्यात आले.



कार्यक्रमाचे संयोजन सदाशिव अमराळे, डि.के. वडगावकर, लखण जाधव, दत्ता सुकाळे यांनी केले. तर अध्यक्ष संतोष गाढवे यांनी प्रास्ताविक केले. शैला जांभळकर/गावडे यांनी सूत्रसंचालन करून मधुकर गिलबिले यांनी आभार मानले.

# शेतजमिनींचे रूपांतर बिगरशेती जमिनीत होणे अन्नसुरक्षेसाठी गंभीर

राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्याकडून शून्य प्रहरात मुद्दा उपस्थित; शेतजमिनींचे संरक्षण करण्याची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

देशातील कृषी क्षेत्र झपाट्याने अकृषी क्षेत्रात रूपांतरित होत असून, अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही अत्यंत गंभीर बाब आहे. भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण कमी होणे चिंताजनक आहे. १४० कोटी नागरिकांच्या अन्नसुरक्षेसाठी सक्षम असलेल्या भारताला सुरक्षित ठेवायचे, तर शेतजमिनींचे संरक्षण करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट मत राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी संसदेत शून्य प्रहरात बोलताना मांडले. प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "देशातील अनेक जिल्हे आणि शहरांमध्ये शेतीजमिनींची प्लॉटिंग करून निवासी प्रकल्प उभारले जात आहेत. यामुळे पेरणीयोग्य क्षेत्रात सतत घट होत आहे. पंजाबमध्ये मागील काही वर्षांत एक लाख हेक्टरपेक्षा अधिक जमीन अकृषिक घोषित करण्यात आली. सध्या भारतात केवळ सुमारे ४५ टक्के जमीनच शेतीखाली असून, त्यात सुमारे ९ टक्क्यांची घट झाली आहे. ही स्थिती कायम राहिल्यास अन्नसुरक्षा, शेतकऱ्यांची उपजीविका, जीएसटी उत्पन्न आणि पर्यावरणीय संतुलन यावर परिणाम होऊ शकतो." एका अभ्यासानुसार लोकसंख्येत एक टक्क्याने वाढ झाली, तर शेती क्षेत्र ०.४५ टक्क्यांनी कमी होते, असे त्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांनी आपली शेतजमीन जपून ठेवत पुढील पिढीसाठी ती सुरक्षित करावी. आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण बियाणे, सूक्ष्म सिंचन आणि सरकारी योजनांचा लाभ घेऊन उत्पादन वाढवावे, अशी सूचनाही त्यांनी केली. शेतजमिनीचे अकृषी क्षेत्रात रूपांतर केवळ व्यापक जनहिताच्या पायाभूत प्रकल्पांसाठीच मर्यादित असावे. उपजाऊ जमिनींचे संरक्षण करण्यासाठी कठोर कायदे लागू करावेत, तसेच जमिनींच्या वापरातील बदलांवर सॅटेलाइट व डिजिटल तंत्रज्ञानाद्वारे नियंत्रण ठेवावे, अशी मागणी त्यांनी केंद्र सरकारकडे कुलकर्णी यांनी केली. तसेच शेतजमीन शेतीसाठीच वापरली जावी. त्यातूनही शेतकऱ्यांना जमीन विकावी लागल्यास सरकारने योग्य मोबदला देऊन ती खरेदी करून शेतीसाठीच वापर सुनिश्चित करावा, असेही त्यांनी सांगितले. कृषी क्षेत्र हे भविष्यातील महत्त्वाचे उद्योग ठरणार असल्याने त्याचे संवर्धन आणि संरक्षण ही काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.




# अध्यक्षपदी दिलीप सूळ यांची बिनविरोध निवड



**दौंड (दै. आरंभ पर्व)**

दौंड तालुक्यातील गोपाळवाडी येथील श्री मस्कोबानाथ विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी दिलीप गुलाबराव सूळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक अधिकारी एस. एस. शिंदे यांनी याची अधिकृत घोषणा केली. माजी अध्यक्ष महेश गंगाराम पवार यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर ही निवडणूक घेण्यात आली होती. अध्यक्षपदासाठी दिलीप सूळ यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. दिलीप सूळ यांना यापूर्वीही संस्थेच्या अध्यक्षपदाचा अनुभव आहे. त्यांच्या कुटुंबाचीही या संस्थेशी परंपरागत नाळ जोडलेली आहे. त्यांचे वडील कै. गुलाबराव सूळ यांनीही या संस्थेचे अध्यक्षपद भूषवले होते. तसेच त्यांच्या पत्नी विजया सूळ या विद्यमान ग्रामपंचायत सदस्या असून त्यांनीही संस्थेच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळलेली आहे. निवडीनंतर दिलीप सूळ यांनी सर्व सभासद आणि संचालक मंडळाचा विश्वास संपादन करून सोसायटीचा सर्वांगीण विकास व सभासदांचे हित जोपासण्यासाठी काम करण्याची ग्वाही दिली. या निवडीच्या वेळी उपाध्यक्ष सुमन जवक, माजी सरपंच अशोकराव सूळ, माजी उपसरपंच आजीनाथ अण्णा लव्हे, माजी अध्यक्ष बाळासाहेब गिरमे, तुकाराम होले, मानसिंग दरेकर, सोनबापू दरेकर, शांताराम होले, अशोक जवळ, योगेश चोरमले, किशोर टेकवडे, ऋतिक डोंगरे, निलेश शेंडे, मयूर सूळ, अजय सूळ, संस्थेचे सचिव छगन सूळ, सहसचिव पांडुरंग लोणकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'हे काय नवीन?' मालिका; मराठी झी5वर विशेष प्रक्षेपण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी मनोरंजनविश्वात हृदयस्पर्शी कथांसाठी ओळखल्या जाणाऱ्या मराठी झी5वर 'हे काय नवीन?' या नव्या मूळ मालिकेचे विशेष प्रक्षेपण सुरू झाले आहे. प्रिया बापट आणि उमेश कामत या खऱ्या आयुष्यातील जोडीदारांची मुख्य भूमिका असलेली ही मालिका आधुनिक वैवाहिक आयुष्यातील पुढच्या टप्प्यांवर भाष्य करते.



दिग्दर्शक वरुण नार्वेकर यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या मालिकेत प्रेम, महत्त्वाकांक्षा, आयुष्याच्या मध्यावरील बदल आणि आत्मशोध या भावनिक पैलूंचा सखोल वेध घेण्यात आला आहे. प्रिया बापट 'रमा' तर उमेश कामत 'आदित्य'च्या भूमिकेत दिसत असून त्यांच्या खऱ्या आयुष्यातील नात्यामुळे कथेला अधिक वास्तववादी स्पर्श लाभला आहे. ही मालिका आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे गाठल्यानंतर उभ्या राहणाऱ्या प्रश्नांवर केंद्रित आहे. रमा आणि आदित्य यांचे आयुष्य स्थिर आणि व्यवस्थित असले तरी त्यांच्या मनात 'आता पुढे काय?' हा प्रश्न निर्माण होतो. दैनंदिन जीवनातील छोट्या क्षणांतून, न बोललेल्या भावनांतून आणि बदलत्या स्वप्नांतून ही कथा पुढे सरकते. रमा स्वतःसाठी काही वेगळे करण्याच्या उद्देशाने विश्रांती घेते आणि सर्जनशील उपक्रमात स्वतःला झोकून देते. छंद म्हणून सुरू केलेल्या तिच्या वस्त्रनिर्मिती उपक्रमाला नवे वळण मिळते. या प्रवासात दोघांनाही वैयक्तिक आणि नातेसंबंधांच्या पातळीवर बदल स्वीकारावे लागतात.

या मालिकेत प्रिया बापट, उमेश कामत यांच्यासह शुभांगी गोखले, उदय टिकेकर, सुयोग गोऱ्हे, राजसी भावे, ओमकार गोवर्धन, तन्वी कुलकर्णी आणि पायल जाधव यांचा समावेश आहे. सर्व कलाकारांनी वास्तववादी अभिनयातून कथा अधिक प्रभावी केली आहे. मराठी झी5च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रेक्षकांच्या जीवनाशी जोडल्या जाणाऱ्या, नातेसंबंध आणि बदलत्या भावनांचा प्रामाणिक वेध घेणाऱ्या कथा सादर करण्यावर त्यांचा भर आहे. 'हे काय नवीन?' ही मालिका अनेक जोडप्यांच्या आयुष्यातील न बोलल्या जाणाऱ्या टप्प्यांना आवाज देते.

प्रिया बापट म्हणाली की, रमाची व्यक्तिरेखा अनेक महिलांना आपलीशी वाटेल, कारण ती वास्तववादी आहे आणि आयुष्यातील भावनिक संघर्ष मांडते. तर उमेश कामतनेही या मालिकेने वैवाहिक आयुष्यातील दुर्लक्षित टप्प्याचे अत्यंत वास्तव चित्रण केल्याचे सांगितले.

दिग्दर्शक वरुण नार्वेकर यांनीही ही कथा साधी, प्रामाणिक आणि मानवी भावनांना जवळची ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे नमूद केले.

### चाहत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**मालिकेच्या प्रक्षेपणापूर्वी कलाकारांनी नागपूरमध्ये चाहत्यांशी संवाद साधत प्रचार केला. त्यांच्या सहज व विनोदी संवादामुळे चाहत्यांना वेगळाच अनुभव मिळाला.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.